# उपसंहार

# उपसंहार

**प्रस्तावना :**

महात्मा गांधी यांनी आधुनिक भारताच्या स्वराज्य स्थापनेसाठी सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह या त्रीसूत्री साधनांच्या माध्यमातून ब्रिटीश सत्तेविरोधी लढा दिला. हा लढा देत असताना स्वराज्या विषयी त्यांची संकल्पना व त्यांचे विचार १९०९ साली 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात त्यांनी माडले.

'हिंदस्वराज्य' या ग्रंथात गांधींजीनी आधुनिक संसदीय लोकशाही व पाश्चिमात्य संस्कृतीला कडाडून विरोध केला. कारण आधुनिक संस्कृतीचा पाया औद्योगिक संस्कृतीचा पाया औद्योगिक विकास व त्यातील भ्रष्ट आचार विचार असून, मुळातच ही व्यवस्था शोषणावर आधारीत आहे. म्हणून आधुनिक लोकशाहीला पर्यायी संस्कृती आणि समाज यांची मांडणी करून शोषण विरहित स्वावलंबी समाज स्थापन करण्याचे विचार गांधींजीनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात मांडले.

'हिंदस्वराज्य' मधील विचारांचा विकास व नवा अन्वयार्थ लावण्याचे कार्य आचार्य विनोबा भावे यांनी १९४० साली लिहीलेल्या 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात केलेला आहे. विनोबांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथामध्ये आधुनिक व्यवस्थेवर टीका करून भांडवलशाही व लोकशाही यांनी पर्यायी सर्वायतन व्यवस्थेची मांडणी केली. सत्तेचे व्यापक विकेंद्रीकरण करून शासन मुक्त समाज स्थापण करणे हे विनोबांचे ध्येय होते. सर्वसत्ता ग्रामसभेला देऊन पक्षविरहित व्यवस्था स्थापन करून जगात अहिंसात्मक समाज स्थापन करण्याचे विचार आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात माडले आहेत. विनोबांनी

'हिंदस्वराज्य'चा विकास करून आधुनिक साम्यवादाला आणि लोकशाहीला त्यांनी पर्यायी साम्ययोग किंवा सर्वोदय व्यवस्थेचे विचार 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात माडण्यात आले आहे.

**<u>संशोधनातील प्रकाणांचा सारंश</u> :**

प्रस्तुत संशोधनाची मांडणी चार प्रकरणांत करण्यात आलेली आहे.

**<u>विषय प्रवेश :</u>**

महात्मा गांधी यांनी १९०९ साली 'हिंदस्वराज्य' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात महात्मा गांधीनी आधुनिक संस्कृती, सभ्यता आणि आधुनिक संसदीय शासन पध्दतीवर प्रखर अशी टीका केली आणि खरा स्वराज्य कशाप्रकारचा असू शकेल याची मांडणी केली. त्यांनी हिंदस्वराज्य या ग्रंथामध्ये पर्यायी राजकारणाचे विचार मांडले आहेत. पुढे १९४० साली आचार्य विनोबा भावे यांनी 'स्वराज्यशास्त्र' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्यांनी आधुनिक व्यवस्थेवर केलेली टीका आणि राजनीतीला पर्यायी लोकनीती, साम्यवादाला पर्यायी साम्ययोग हे राजकीय विचार मांडले. 'स्वराज्यशास्त्रा'त 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात जे पर्यायी राजकीय विचार मांडण्यात आलेले आहेत. त्याचा विकास केला आहे. या पर्यायी राजकीय विचारसणीला 'पर्यायी गांधीवादी राजकारण' असे म्हणतात येईल. या 'पर्यायी गांधीवादी राजकारण' याचं थोडक्यात विवेचन केले आहे.

महात्मा गांधीच्या राजकीय तत्वज्ञान आणि जीवन या विषयावर मोठया प्रमाणामध्ये साहीत्य प्रकाशित झाले आहे. दर वर्षी अनेक पुस्तक, हजारोलेख प्रकाशित होतात. मात्र त्याप्रमाणामध्ये आचार्य विनोबा भावे यांच्या राजकीय विचारांचा, गांधी आणि विनोबा

यांच्यातील वैचारीक अनुबंधाचा इतका अभ्यास झाला नाही तरी प्रस्तुत प्रकरणात या दोघांच्या राजकीय विचारवंतानी लिखाण केले आहे. याचा आढावा घेण्यात आला आहे.

**'हिंदस्वराज्य'मधील पर्यायी राजकारणाचा विचार :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये महात्मा गांधीजीनी 'हिंदस्वराज्य' लिहिण्यामागची त्यावर पडलेल्या प्रभावाच्या वैचारीक पार्श्वभूमीचा आढावा घेतला आहे. इंग्लंड मधील आणि पाश्चात्य विचारवंत थोरो, रस्किन आणि टॉलस्टॉय यांच्या मतप्रणालीचे पडसाद. १९०९ साली प्रसिध्द झालेल्या गांधींच्या 'हिंदस्वराज्य' या पुस्तकाचा उदय दक्षिण आफ्रिकेचा सत्याग्रहानंतर लंडनहून दक्षिण आफ्रिकेला परतताना जहाजावर झाला. या ग्रंथाचे स्वरूप हे संवाद रूपाने असून, त्यातील महत्त्वाचे जे मुद्दे आहेत ते मुद्दे लंडनमधील भारतीयांच्या संवाद झाले त्यातील आहे. महात्मा गांधीचा 'हिंदस्वराज्य' लिहिण्यामागचा उद्देश एक पर्यायी व्यवस्था स्थापन करण्याचा होता. 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात आधुनिक संस्कृतीतील वकील, डॉक्टर, रेल्वे, यंत्र संस्कृती या सर्व संस्था आणि आधुनिक संस्कृती ही स्वार्थ, लोभ, हाव यावर आधारलेली आहेत म्हणून नफेखोरी ही आधुनिक संस्कृतीचे वैशिष्ट आहे असे गांधी यांचे मत होते. महात्मा गांधीनी ब्रिटीश राजवटीवर टीका करून इंग्लंडची संसदीय शासन पध्दती ही वांझोटी आणि वेश्या आहे. अशी प्रखर टीका करतात. महात्मा गांधी यांनी 'हिंदस्वराज्य' या ग्रंथात इटलीचे उदाहरण दिले आहे. त्यांच्या मते इटली स्वतंत्र्य होऊन ही तेथील लोक गुलाम बनले. त्याप्रमाणे महात्मा गांधीना इंग्रजांना हाकलून देऊन, हिंदुस्थानचा इंग्लीस्थान करायचा नाही. तर त्यांना हिंदुस्थानात खरे स्वराज्य स्थापन करायचे होत. त्यांना संसदीय शासन पध्दतीला पर्यायी व्यवस्था ग्रामस्वराज्यावर

उभी करावयाची होती. प्रत्येक गाव स्वायत्त व स्वावलंबी असेल. परंतु या पर्यायी राजकीय व्यवस्थात आणि विचारांचा अपूर्ण विकास झालेला दिसतो. पुढे याचा विकास आचार्य विनोबा भावे यांनी आपल्या 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात केला आहे.

**<u>'स्वराज्यशास्त्रा'मधील पर्यायी राजकारणाचा विचार</u> :**

प्रस्तुत प्रकारणामध्ये आचार्य विनोबा भावे यांच्या संक्षिप्त चरित्राचा आढावा घेण्यात आला आहे. विनोबांची दृष्टी क्षेष्ठ मीमांसकाची व तीक्ष्ण बुध्दीच्या भाष्यकाराची होती. म्हणून आचार्य विनोबा भावे हे महात्मा गांधींचे वैचारिक आणि आध्यात्मिक वारसदार होत. महात्मा गांधीच्या सर्व राजकीय विचारांचे श्रेष्ठ भाष्यकार होते. विनोबांनी भांडवलशाहीवर टीका करून अतिशय क्रूर व अधम स्पर्धेवर भर देणारी आहे. तसेच वासनाचे आविष्कार करणारी, धनसंचयाला उत्तेजन देणारी, उपभोगवादी, प्रत्येक गोष्ट पैशात मोजणारी व्यवस्था आहे. साम्यवादी व्यवस्था ही हिंसेवर आधारलेली आहे. त्यामुळे विनोबांनी भांडवलशाही आणि साम्यवाद यांना साम्ययोग हा पर्यायी विचार मांडला. विनोबांनी राजनीतीला लोकनीती हा पर्याय दिला. लोकनीती ही विकेंद्रीकारणावर आधारलेली आहे, असे मत विनोबांनी मांडले आहे. विनोबांनी महात्मा गांधींच्या 'हिंदस्वराज्य' या ग्रंथाचा विकास 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात केला. त्यांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात एकायतन, अल्पसंख्यायतन आणि बहुसंख्यायतन या व्यवस्थेत सर्व राजकीय व्यवस्था बसवून त्यासर्व भ्रष्ट आहेत असे सांगून. त्यांना सर्वायतन व्यवस्था स्थापन करायची होती. 'स्वराज्यशास्त्र' हा अहिंसेवर आधारलेले शासन निरपेक्ष, 'रामराज्य' अथवा ग्रामस्वराज्यावर स्थापन करणार जाहीरनामा आहे, असे विनोबा म्हणतात. अशा प्रकारे आचार्य विनोबा भावे यांच्या राजकीय विचारातून एक पर्यायी

राजकीय विचार व्यक्त होतात. राजकीय व्यवस्थेला पर्याय देऊन सर्वायतन व्यवस्था मांडण्याचा प्रयत्न विनोबांनी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात केला आहे. हे पर्यायी गांधीवादी राजकारण आहे.

<u>टीकात्मक अभ्यास</u> :

महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' या पुस्तकेत मांडलेली भूमिकेचा प्रस्तुत प्रकरणामध्ये उहापोह करण्यात आले आहे. त्यांनी या ग्रंथात पाश्चात्य सभ्यता अथवा संस्कृती, संसदीय लोकशाहीवर यावर टीका करून, त्यांनी 'राज्य' जनतेने आपल्या स्वेच्छेने निवडून दिलेल्या प्रतिनीधींचे का असेना, पण खरे समतायुक्त, मैत्रिपूर्ण आणि सौहार्दम्य असे अहिंसेवर आधालेले असावे असे सांगितले आणि स्वराज्य म्हणजे स्वतःतचे राज्य, असले पाहिजे अशी भूमीका महात्मा गांधींनी 'हिंदस्वराज्य' यात मांडली याचे विवेचन या प्रकरणात केले आहे.

महात्मा गांधींनी १९०९ साली 'हिंदस्वराज्य' हे पुस्तक लिहिले आणि आचार्य विनोबा भावे यांनी १९४० साली 'स्वराज्यशास्त्र' हे पुस्तक लिहिले या दरम्यानच्या कालखंडातल्या राजकीय बदलाचा थोडक्यात विवेचन केले आहे. आचार्यांनी 'हिंदस्वराज्य' या पुस्तकाची 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथात केलेली वाढ आणि विनोबांचे 'स्वराज्यशास्त्र' म्हणजे गांधीच्या 'हिंदस्वरज्या'चेच पुढचे पाऊल आहे. 'हिंदस्वराज्य' लिहिण्यामागे स्वतंत्र चळवळीची पार्श्वभूमि होती तशी 'स्वराज्यशास्त्र' या ग्रंथाला नसून ते एका वैश्विक पायावर आधारलेली आहे. तसेच 'हिंदस्वराज्य' आणि 'स्वराज्यशास्त्र' यांतील विचारणीवर भारतीय आध्यात्मिक परंपरेचे ठसे आहेत. या काहीशा 'देशी' प्रभावमुळे ही विचारसरणी एका अर्थाने

संस्कृतिसापेक्ष अथवा प्रादेशिक होते अथवा तिच्या सार्वत्रिक व शाश्वत मौलितेला काही मर्यादा पडतात.